# अर्जाचा नमुना

## सेवानिवृत्त राज्य शासकीय/निम शासकीय अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्तीकरीता अर्ज

१) अर्जदाराचे संपूर्ण नाव :- ..............................................................

२) अर्जदाराचा पत्ता :- ..............................................................

..............................................................

..............................................................

३) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :- ..............................................................

४) भ्रमणध्वनी क्रमांक :- ..............................................................

५) जन्म दिनांक व वय :- ..............................................................

६) विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय ? :- होय / नाही

७) अनुभव :- ..............................................................

..............................................................

"किमान आधारभूत किंमत खरेदी योजना" या योजनेची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी सेवा करार पध्दतीने नियुक्तीबाबतची जाहिरात/सूचना मी www.mahafood.gov.in या संकेतस्थळावर काळजीपूर्वक वाचली असून, सदर जाहिरातीतील/सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी

Detailed advertise on Website

## अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

"राज्य शासकीय अधिकारी यांची सेवा करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत."

**विभागाची आवश्यकता :-**

विभागातील अधिकारी/कर्मचारी यांची अपुरी संख्या लक्षात घेता, तसेच धान व भरडधान्य खरेदी प्रक्रियेवर प्रभावी संनियंत्रणाकरिता पणन क्षेत्रात अथवा अभिकर्ता संस्थांसोबत काम केलेले तसेच किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेच्या कामातील अनुभवी अधिकारी यांची अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई येथे **सेवा करार पध्दतीने १ वर्षाकरीता** नियुक्ती करावयाची आहे.

**पात्रता व अनुभव :-**

१) कोणत्याही शाखेतील पदवीधर.

२) महाराष्ट्र शासनामध्ये गट -१ दर्जाचा अधिकारी व "**किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेच्या कामातील**" किमान १० वर्षांचा अनुभव.

**कामाची व्याप्ती खालील प्रमाणे असेल**

१) किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान खरेदी व भरडाई तसेच भरडधान्य खरेदी प्रक्रियेबाबतच्या कामकाजासाठी कार्यासनास सहाय्य करणे.

२) धान खरेदी व भरडाईबाबत तसेच भरडधान्य खरेदीबाबत अभिकर्ता संस्थाकडून अहवाल घेऊन शासनास दैनंदिन अहवाल देणे.

३) या योजनेमध्ये दोन्ही अभिकर्ता व संबंधीत क्षेत्रीय कार्यालये व इतर संबंधीत व्यक्ती या सर्वांमध्ये समन्वय ठेवणे.

४) संपुर्ण महाराष्ट्रातील धान व भरडधान्य खरेदी केंद्राची माहिती अद्यायवत करुन शासनास उपलब्ध करुन देणे.

५) सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये वितरीत झालेल्या सीएमआर तांदळाची संबंधितांकडून माहिती घेऊन शासनास उपलब्ध करुन देणे.

६) उपलब्ध माहितीच्या आधारे दैनंदिन अहवाल करुन ते जतन करुन ठेवणे.

७) शासन निर्णय आदर्श कार्यपध्दती मार्गदर्शक सुचना यांचा मसुदा तयार करण्यामध्ये शासनास सहाय्य करणे

८) सदर योजनेची अंमलबजावणी करते वेळी येणा-या अडचणी व समस्यांचे अवलोकन करुन त्यांच्या निराकरणाचे उपाय सुचवणे.

**<u>कर्तव्य व जबाबदा-या</u>**

१) धान खरेदी व भरडाईबाबत तसेच भरडधान्य खरेदीबाबत दैनंदिन अहवाल तयार करणे.

२) धान खरेदी व भरडाईबाबतच्या कामकाजासंदर्भात अभिकर्ता संस्थाच्या अडचणी शासनापर्यत पोहचविणे.

३) धान खरेदी व भरडाईबाबतच्या ऑनलाईन कामकाजावर लक्ष ठेवणे.

४) सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे पायाभुत (Domain) ज्ञान.

५) माहिती तंत्रज्ञान संबंधीत पायाभूत सुविधांचे व्यवस्थापन.

६) कामकाजाशी संबंधितांमध्ये समन्वय ठेवणे.

**<u>इतर अटी व शर्ती</u> :-**

१) सदर नियुक्ती केवळ १ वर्षाकरीता सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येईल.

२) विभागास आवश्यक असलेली अर्हता धारण करणाऱ्या मागील दोन वर्षात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांना प्राधान्य देण्यात येईल.

३) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

४) उमेवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

५) उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्हयात राहणारा असावा.

६) आवश्यक अर्हता धारणा करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांनी सदर पदाकरीता विहित नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

७) उमेदवाराने सदर पदाकरीता अर्ज दिनांक ३१.३.२०२१ पर्यंत "सह सचिव (नापु-२९), दालन क्र.२१९, विस्तार इमारत, २ रा मजला, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२" या पत्त्यावर पोहोचेल, अशारितीने पोस्टाने पाठवावा अथवा व्यक्तीश: आणून द्यावा. यासंदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२०२६०४८ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही तसेच यासंदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

८) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी अर्ज सादर केल्यास, अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

९) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबत संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.

१०) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिका-यास अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, येथे काम करावे लागेल.

११) कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी हे प्रधान सचिव (अनापुवग्रासंवि)/सह सचिव (नापु-२९) यांच्या नियंत्रणाखाली काम करतील व त्यांना कामकाजाचा अहवाल दरमहा सादर करतील.

१२) इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७.१२.२०१६ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

-*-*-*-*-*-*-